# नाशिक महानगरपालिका, नाशिक
## उदयान व वृक्ष प्राधिकरण विभाग
## मानधन तत्त्वावरील “उदयान निरीक्षक” जागांसाठी भरती प्रक्रिया
## जाहिरात

नाशिक महानगरपालिका उदयान व वृक्ष प्राधिकरण विभाग अंतर्गत उदयान निरीक्षक पदे मानधन पदधतीने भरण्यासाठी अर्हता धारक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सर्व संबधित उमेदवारांनी किमान शैक्षणिक अर्हता धारण करत असल्यास आवश्यक त्या सर्व प्रमाणपत्रास जाहिरात प्रसिध्द झालेल्या तारखेपासुन जाहिरातीमध्ये विहित नमुन्यातील असलेला अर्ज/संकेतस्थळावर प्रसिध्द केलेला विहित नमुन्यातील अर्ज डाउनलोड करुन सादर करावा. अर्ज कार्यालयीन सुट्टी व सार्वजनिक सुटटी वगळुन सकाळी १०:०० ते ०५:०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख दि. 17/11/2018 रोजी सांयकाळी ०५:०० वाजेपर्यंत असेल. यानंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. परंतु अर्ज स्विकारणेच्या अंतिम वेळेबाबत स्थानिक परिस्थितीप्रमाणे बदल करण्याचा अधिकार निवड समितीस असेल. जाहिरात मुदतीत प्राप्त अर्जांची छाणणी करुन यादी मुलाखतीसाठी मनपाच्या नोटिस बोर्डवर तसेच मनपाच्या www.nashikcorporation.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्या दिवशी मुलाखतीच्या बाबत गुणपत्रिका तयार करुन पात्र उमेदवारांची यादी मनपाच्या नोटिस बोर्डवर व www.nashikcorporation.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**अर्ज स्विकारण्याचे ठिकाण व वेळ** :- उदयान व वृक्ष प्राधिकरण विभाग , 3 रा मजला, मनपा मुख्यालय, राजीव गांधी भवन, शरणपूररोड, नाशिक. **वेळ** :- सकाळी १०:०० ते ०५:००

**मुलाखतीचे ठिकाण** :- **वेळ** :- सकाळी १०:०० ते ०५:००, दि. 22/ 11 /2018 रोजी मिटींग हॉल, महिला व बाल कल्याण विभाग, 3 रा मजला, मनपा मुख्यालय, राजीव गांधी भवन, शरणपूररोड, नाशिक

1. अर्जाची छाननी झाल्यानंतर मुलाखतीस पात्र उमेदवारांची यादी www.nashikcorporation.in या संकेत स्थळावर तसेच मुख्य प्रवेशव्दार, नोटिस बोर्ड, मनपा मुख्यालय, राजीव गांधी भवन, शरणपूररोड, नाशिक येथे लावण्यात येईल. पात्र उमदेवारांच्या मुलाखती दि. दि. 22/ 11 /2018 रोजी सकाळी १०:०० ते ०५:०० वेळेत घेण्यात येतील.
2. मुलाखती नंतर पात्र उमेदवारांना स्वतंत्ररित्या कळविणेत येणार नाही.

| अ. क्र. | पदनाम | किमान शैक्षणिक अर्हता | वय दिनांक 31/07/2018 | एकुण पद संख्या | एकत्रित मासिक मानधन |
|---|---|---|---|---|---|
| १ | उदयान निरीक्षक | बी. एस्सी (कृषी) अथवा<br>बी. एस्सी (उदयानविदया)<br>अथवा<br>बी. एस्सी (फॉरेस्ट्री) | ४५ वर्षापर्यत (सेवानिवृत्त् कर्मचाऱ्यांसाठी ६० वर्षापर्यत) | ५ | २५०००/- |

**अटी व शर्ती** :-

१. उदयान व वृक्षप्राधिकरण विभाग मनपा, नाशिक अंतर्गत भरण्यात येणा-या सर्व उदयान निरीक्षकांची निवड मुलाखत पदधतीने करण्यात येईल.

२. सदरील पदांचा मनपा, नाशिक महानगरपालिकेच्या आस्थापनेशी कोणत्याही प्रकारचा संबंध राहणार नाही.

३. सदरील पदे ही निव्वळ मानधनावर भरावयाचे आहेत. सुरूवातीस निवड झालेल्या उमेदवारांना ६ महिन्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात कामाचे आदेश दिले जातील.

४. अनुभवाच्या बाबतीत फक्त शासकिय, निमशासकिय, स्थानिक स्वराज्य संस्था अंतर्गत असणारा अनुभव ग्राहय धरला जाईल.

५. मुलाखतीस पात्र उमेदवारांनी मुळ प्रमाणपत्रे व सर्व प्रमाणपत्रांची साक्षांकित सत्यप्रतींसह मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे.

- पासपोर्ट साईज फोटो-२, जन्म तारखे करिता (वयाचा दाखला/१० वी चे टी.सी/जन्म प्रमाणपत्र), फोटो
- आयडी मतदान ओळखपत्र/आधारकार्ड इ. शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र, शेवटच्या वर्षाची गुणपत्रिका,
- रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र, मुलाखतीच्या अनुषंगाने इतर कागदपत्रे मूळ व सत्यप्रत साक्षांकित प्रत.

६. अर्ज छाननी अंती पात्र ठरणा-या उमेदवारांना मुलाखतीसाठी प्रवेश देण्यात येईल.

७. पात्रतेसाठी एकुण १०० गुण असतील व त्याची विभागणी खालीलप्रमाणे असेल.

| **अ. क्र.** | **तपशिल** | **गुण** |
|---|---|---|
| १. | पदवी/ पदव्युतर पदवीका/पदव्युतर पदवी शेवटच्या वर्षाच्या गुणानुसार | ८० गुण |
| २. | पदव्युत्तर पदविका असल्यास अतिरिक्त १ गुण, पदव्युत्तर पदवी असल्यास अतिरिक्त २ गुण. | जास्तीत जास्त ५ गुण |
| ३. | १ वर्षापेक्षा कमी अनुभव असल्यास ० गुण, १ ते २ वर्ष अनुभव असल्यास १ गुण, २ ते ३ वर्ष अनुभव असल्यास २ गुण याप्रमाणे पुढील प्रत्येक वर्षासाठी १ गुण याप्रमाणे जास्तीत जास्त ५ गुण राहतील. अनुभवाच्या बाबतीत फक्त शासकिय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था अंतर्गत असणारा अनुभव ग्राहय धरावा. | जास्तीत जास्त ५ गुण |
| ४. | विषय ज्ञान | १० गुण |
| | **एकुण गुण** | **१०० गुण** |

८. उच्च शैक्षणिक अर्हता प्राप्त उमेदवार यांना प्राधान्य देणेत येईल.

९. उमेदवारांनी कुठल्याही प्रकारचा राजकीय दबाव आणल्यास त्यांना मुलाखतीस व नियुक्तीस अपात्र ठरविण्यात येईल.

१०. नियुक्तीबाबतचा अंतिम अधिकार आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांनी राखुन ठेवला आहे.

**Sd/-**
**आयुक्त,**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

# अर्ज

प्रति,
मा. आयुक्त
नाशिक महानगरपालिका, नाशिक

फोटो

1. पदाचे नांव :- ____________________
2. उमेदवाराचे नांव :- ____________________
3. पत्रव्यवहाराचा पत्ता :- ____________________
   :- ____________________
   ____________________
4. भ्रमणध्वनी :-
5. ई-मेल आय.डी. :-
6. जन्मतारीख :-
7. वय (दिनांक / /2018 रोजीचे वय) :-
8. लिंग :- स्त्री / पुरूष
9. शैक्षणिक पात्रता

| **अ.क्र.** | **शैक्षणिक पात्रता** | **परिक्षा मंडळ / विद्यापिठाचे नाव** | **उतीर्ण झाल्याचे वर्ष** | **मिळालेल्या गुणांची टक्केवारी** |
|---|---|---|---|---|
| 1. | | | | |
| 2. | | | | |
| 3. | | | | |
| 4. | | | | |
| 5. | | | | |

10. अनुभव असल्यास :- तपशील व कालावधी देणे

| **अ.क्र.** | **काम केलेल्या संस्थेचे नांव** | **कालावधी वर्षामध्ये** | **कामाचे स्वरूप** |
|---|---|---|---|
| 1. | | | |
| 2. | | | |
| 3. | | | |
| 4. | | | |
| 5. | | | |

**अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे** :-

1) 
2) 
3) 
4) 
5) 
6) 
7) 
8) 

ठिकाण :-
दिनांक :- / /2018

उमेदवाराची स्वाक्षरी